दिनांक : ११.०४.२०२४

माधवी ओगले व्यावसायिक शाळा ( MOVS )
वार्षिक अहवाल २०२३ - २०२४

मुख्याध्यापिका, ९ शिक्षक, ३ मावश्या, १ काका व ४ ताई व १ दादा मदतनीस कार्यरत आहे.
शाळेत एकूण ४३ विद्यार्थी आहेत.

शाळेत एकूण विद्यार्थ्यांचे त्यांच्या शारीरीक, बौध्दिक व मानसिक क्षमताचा विचार करून ४ वर्गाची आखणी केली आहे. त्या व्यतिरिक्त खेळ, क्राफ्ट, शारीरक व्यायाम, योगा, गायन या ॲाटिव्हिटी विद्यार्थ्यांच्या गरजेप्रमाणे चालू आहे. विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाणे एप्रिलमध्ये अभ्यासक्रमाची आखणी केली जाते. विद्यार्थ्यांना वहया, शैक्षणिक साहित्य पुरविले जाते आणि यावर्षी अभ्यासक्रमाचे पुस्तक छापून घेण्यात आले व विद्यार्थ्यांना ते देण्यात आले आहेत.

दरवर्षी प्रमाणे चालणारे सर्व उपक्रम नियमीत सुरू होते.

नविन प्रवेश

- यावर्षी बाहेरील एकूण १३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. तर लार्क शाळेतून ३ व फिनिक्स शाळेतून १ विद्यार्थ्याने प्रवेश घेतला.

सातत्याने चालणारे उपक्रम

- दि. ०१ जून रोजी संस्थेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी सर्व प्रिझम सटाफ उपस्थित होता.
- दि. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिना निमित्त 'मेरी मिटी मेरा देश' अंतर्गत मातीच्या पणत्या विद्यार्थ्यांकडून बनवून घेण्यात आल्या होत्या.
- लिप्पन आर्ट ही कलाकृती दि. २१ ते ३०.०८.२०२३ पर्यंत विद्यार्थ्यांकडून पूर्ण करून घेण्यात आली.
- दि. ०५.०९.२०२३ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी सर्व शाळेचे कामकाज पाहिले. तसेच शिक्षक विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक व मावशी काकांच्या स्पर्धा व ॲक्टिव्हिटी घेतल्या. एम.ओ.व्ही.एस शाळेतील विद्यार्थ्यांनी बनविलेले पेन्टिंग बॉटल प्रिझम स्टाफ, व एम.ओ.व्ही.एस शाळेतील शिक्षकांना भेट म्हणून देण्यात आल्या. तर लार्क शाळेतील शिक्षकांना पेन्टिंग बॉटल भेट म्हणून देण्यात आला. प्रिझम फौंडेशन कडून सर्व शिक्षकांना सुंदर दिवा भेटवस्तू म्हणून देण्यात आला.
- दि. २०.०९.२०२३ रोजी संस्थेत 'गणेश स्थापना' करण्यात आली. यावर्षी 'जंगल' याविषयावर हॉल सजावट करण्यात आली होती. यासाठी विद्यार्थ्यांनी चित्रे व चार्ट तयार केले होते.

- दि. ०८.०९.२०२३ रोजी कै. पद्मजा गोडबोले आंतरशालेय कविता पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेच्या प्रमुख पाहुण्या व परिक्षक म्ह णून मा. आरती भट या उपस्थित होत्या. या स्पर्धेत बाहेरील ७ शाळा मिळून एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे नियोजन लार्क व एम.ओ.व्ही.एस शाळेतील शिक्षकांनी केले होते.
- दि. २२.१२.२०२३ रोजी आयोजित शेकोटी हा उपक्रम राबविण्यात आला होता. सर्व विद्यार्थ्यांनी वेगवेगळया खेळांची मजा घेतली. विद्यार्थ्यांना पुरी, केक व बाकरवडी हा खाऊ म्हणून देण्यात आला.
- काही विद्यार्थ्यांना 'चित्तरंजन वाटिका' येथे सहलीला नेण्यात येऊन खाऊ देण्यात आला. तर काही विद्यार्थ्यांना 'शांतीवन' येथे एक दिवसीय सहलीस नेण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी सहलीचा आनंद घेतला.
- दि. ०३.०२.२०२४ रोजी 'पुणे परिसर' या विषयावर तिन्ही शाळांचे एकत्रित प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी चार्ट, प्रोजेक्ट करून आणले होते. विविध खेळ ठेवण्यात आले होते तर काही पालक व बाहेरील व्यक्तींना विक्री साठी स्टॉल देण्यात आले होते. प्रदर्शन छान झाले असा अभिप्राय खूप पालकांनी दिला. याची बातमी वृत्तपत्रामध्ये सुध्दा आली आहे.
- दि. २३.०२.२०२४ रोजी अनुग्रह फौंडेशन आयोजित दिव्यांग जनजागृती फेरी संभाजी उद्यान येथे शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते.
- वार्षिक ॲक्टिव्हिटी म्हणून विद्यार्थ्यांकडून त्यांनी स्वत: आणलेल्या कप वर पेन्टिंग करून घेतले.
- विद्यार्थ्यांचे सेफ्टी ड्रील व मॉप ड्रील घेण्यात येऊन त्याचे कारण महत्व समजावून सांगण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रम

| दिनांक | कार्यक्रम | पाहुणे / परीक्षक | स्पर्धा / कार्यक्रम |
|---|---|---|---|
| १६.०६.२०२३ | पर्यावरण दिन | सुषमा कदम पाटील | झाडांविषयी माहिती सांगून वृक्षारोपण करण्यात आले. |
| २१.०६.२०२३ | योगा दिवस | - | विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाणे योगासने करून घेण्यात आली. |
| २८.०६.२०२३ | पालखी | - | विद्यार्थ्यांनी भक्ती गीत व संतांची माहिती सांगणारे नाटक सादर केले. |
| ०३.०७.२०२३ | गुरूपौर्णिमा | साधना ओढेकर | वक्तृत्व स्पर्धा |
| ०२.०८.२०२३ | लोकमान्य टिळक पुण्यतिथी | श्री. उदय गाडगीळ | पाढे पाठांतर स्पर्धा व वादविवाद स्पर्धा |
| २९.०८.२०२३ | रक्षाबंधन | प्रिझम फौंडेशनचा ॲडमिन स्टाफ | चित्रकला व टाकाऊ वस्तू पासून वस्तू बनविणे स्पर्धा |
| ०४.०९.२०२३ | कै. पद्मजा गोडबोले आंतरवर्गीय कविता पाठांतर स्पर्धा | विद्या भागवत | कविता पाठांतर स्पर्धा |
| ०७.०९.२०२३ | दही हंडी | - | विद्यार्थ्यांनी दही हंडीचे चित्र रंगून दहीकाल्याचा प्रसाद बनविला. |
| १३.०९.२०२३ ते १५.०९.२०२३ | गणेशोत्सव | - | विद्यार्थ्यांच्या जीवन व्यवहार कृती स्पर्धा घेतल्या गेल्या |
| दिनांक | कार्यक्रम | पाहुणे / परीक्षक | स्पर्धा / कार्यक्रम |

| | | | |
|---|---|---|---|
| १४.०९.२०२३ | 'सॅलाड डेकोरेशन' | मा.हर्षा मुळे | विद्यार्थ्यांनी भाज्या व फळांच्या साहाय्याने सॅलेड डेकोशनची डीश तयार केली. |
| १६.१०.२०२३ | वाचन दिन | - | विद्यार्थ्यांनी पुस्तकातील परिच्छेद, चित्रवाचन, इंग्रजी मधील शब्द वाचन केले. |
| २०.१०.२०२३<br><br>२३.१०.२०२३ | शारदोत्सव<br><br>खंडेनवमी | - | भोंडला करून शिक्षकांतर्फे विद्यार्थ्यांना खिरापत देण्यात आली.<br>सर्व साहित्यांची पूजा |
| ०३.११.२०२३ | दिवाळी पार्टी | - | विद्यार्थ्यांनी किल्ला बनविला, फटाक्यांची आतिषबाजी उडवून दिवाळी साजरी केली. |
| ०१.१२.२०२३ | क्रीडा स्पर्धा | मा. प्रसाद कानडे | विविध स्पर्धांचे आयोजन |
| १६.१२.२०२३ | स्नेहसंमेलन<br>विषय -<br>'मी, आपण, आम्ही' | सौ. स्नेहलता देशमुख | विद्यार्थ्यांनी विषयानुरूप नृत्य, नाटक सादर केले. |
| २६.०१.२०२४ | प्रजासत्ताक दिन<br>तमोहर प्रकाशन | मा.श्री रविंद्र वंजारवाडकर | विद्यार्थ्यांनी गायन व लेझीम प्रात्यक्षिके सादर केली. |
| १०.०२.२०२४ | बाजार दिन | - | विद्यार्थ्यांना वस्तू विक्री, खरेदी करणे याची माहिती मिळावी या उद्देशाने |
| २७.०२.२०२४ | मराठी दिन | - | वर्गात शिक्षकांनी शब्द वाचन, चित्र वाचन, जोडीचे शब्द, अशा कृती करून घेतल्या. |
| २८.०२.२०२४ | विज्ञान दिन | - | विद्यार्थ्यांना वर्गात प्रयोग करून दाखविले. तसेच बालकल्याण आयोजित विज्ञान प्रयोग प्रदर्शन पाहण्यास विद्यार्थी गेले होते. |
| २९.०३.२०२४ | रंगपंचमी | - | विद्यार्थ्यांनी एकमेंकांना रंग लावून आनंद साजरा केला. |

शैक्षणिक सहल

| गट | ठिकाण / स्थळ |
|---|---|
| गट क्र. १ | बालगंधर्व येथे ॲम्युनेशन फॅक्टरीने आयोजित केलेल्या युध्द निर्माण साहित्य पाहण्यास |
| गट क्र. ३ | हनुमान स्टोअर्स<br>'कामायनी उद्योग केंद्र' |
| गट क्र. २ व ४ | वाहतुक संदेश अंतर्गत सिग्नल नियम, झेब्रा क्रॉसिंग इ. माहिती<br>पी.वाय.सी जिमखाना येथे खेळाचे मैदान व हॉल मधील खेळ याची माहिती |
| गट क्र. १ व ३ | Lead Hand India येथे बागकाम, बेकरी या व्यावसायिक विषयाची माहिती |

वरील शैक्षणिक सहली मधून सामाजिक कौशल्य वाढावे, आजूबाजूच्या परिसराचे ज्ञान व्हावे, अभ्यासक्रमात ज्या गोष्टी आपण शिकतो त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा हा उद्देश साध्य होण्यास मदत झाली.

- Saplings School ला मुख्याध्यापिका व २ शिक्षिकांनी भेट देवून तेथील शैक्षणिक साधनांविषयी माहिती घेतली. गायत्री रांजणगावकर यांनी गणित, भाषा विषयाच्या विविध साधनांची माहिती दिली.

पालक सभा

- दि. २४ जून २०२३ रोजी पहिली पालक सभा घेण्यात आली. यावेळी १९ पालक उपस्थित होते. संचालिका हर्षा मुळे यांनी संस्थेची माहिती सांगितली. विद्या भागवत यांनी वेन्यू प्रशिक्षण केंद्रातर्फे चालविले जाणारे कोर्स व पालक कार्यशाळेची माहिती दिली. शाळेविषयी पर्यवेक्षिका प्रतिभा मुळे यांनी माहिती दिली.
- ऑक्टोबर मधील सभेत सहामाही मूल्यमापन संदर्भात माहिती देण्यात आली.
- दि. २०.०१.२०२४ रोजी सभेत २६ जानेवारी, प्रदर्शन / प्रोजेक्ट, बाजार दिन, नऊमाही मूल्यमापन बाबत सांगण्यात आले.
- दि. ०४ ते १५.०३.२०२४ याकालवधीत प्रत्येक गटाची स्वतंत्रपणे पालकसभा घेण्यात आली. यामध्ये पुढील नियोजन, बदालेल्या पी.टी युनिफॉर्म बाबत सांगण्यात आले.

स्पर्धा

- कामायनी शाळा - निगडी आयोजित सुगम गायन स्पर्धेत, कर्न्सन इंडिया आयोजित चित्रकला स्पर्धा, नवक्षितीज आयोजित पर्वती चढणे स्पर्धेत शाळेतील १३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.
- दि. २४.०८.२०२३ रोजी लायन्स क्लब इंटरनॅशनल आयोजित नृत्य गायन स्पर्धेत शाळेला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.
- दि. ०६.१०.२०२३ बालकल्याण आयोजित नृत्य, वादन व संगीत राज्यस्तरीय गायन स्पर्धेत निधी पाटील हिला व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.
- दि. १२.१०.२०२३ रोजी नवक्षितिज आयोजित आंतरशालेय नाटय स्पर्धेत शाळेने सहभाग घेतला होता. या स्पर्धेत शाळेला व्दितीय क्रमांकाचे व दिग्दर्शनाचे दिपा खांडरे या शिक्षिकेला व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.
- दि. २०.१२.२०२३ रोजी जीवन ज्योत आयोजित नृत्य स्पर्धेत शाळेने सहभाग घेवून दुसरे बक्षिस मिळाले. तसेच मैदानी स्पर्धेतही सहभाग घेतले.
- उमेद परिवारा तर्फे घेण्यात येणा-या भेटकार्ड / भित्तीचित्र स्पर्धेसाठी २ विद्यार्थ्यांना दुसरे व तिसरे बक्षिस मिळाले.

बाहेरील कार्यशाळा

- दि. ०४.०८.२०२३ रोजी बालकल्याण आयोजित 'कळी उमलताना' या कार्यशाळेस ४ विद्यार्थीनी, १ शिक्षिका व १ सेविकेने सहभाग घेतल्या.
- नवक्षितीज आयोजित 'नाटक कसे बसवावे' या कार्यशाळा, KEM आयोजित 'मुलांच्या वर्तवणुक समस्या' या विषयावरील कार्यशाळा, बालकल्याण व निकलास फौंडेशन नागपुर आयोजित 'शैक्षणिक साधनांचे प्रदर्शन व शिक्षकांसाठी प्रशिक्षण' कार्यशाळा यामध्ये शाळेतील शिक्षकांनी सहभाग घेतला होता.

कार्यशाळा / कोर्स

- वेन्यू तर्फे शिक्षकांसाठी वर्षभर घेण्यात आलेल्या गप्पांगण कार्यशाळेत शाळेतील शिक्षकांनी स्वत: निवडलेल्या विविध विषयावर कार्यशाळा घेतली.
- वेन्यू तर्फे घेतल्या गेलेल्या शॉर्ट कोर्स मध्ये स्वाती सगम यांनी 'मतिमंदत्व' याविषयावर व्याख्यान घेतले.

उत्पादन

- श्री. योगेश कुलकर्णी वर्षभर ऑर्डर दिलेल्या पिशव्या बनविण्याचे काम पूर्ण करून देण्यात आले.
- गुरूकुल शाळेच्या १०२४ फाईल्स् ची ऑर्डर पूर्ण करून देण्यात आली.
- श्री. पटवर्धन यांनी दिलेल्या रेगझिंन बॅगची ऑर्डर पूर्ण करण्यात आली.

स्टॉल

- ऑक्टोबर मध्ये 'प्रोत्साहन', नोव्हेंबर मध्ये 'उमंग' व मार्च मध्ये सिकल्स्ड आयोजित 'चैत्रांगण' या तीन प्रदर्शनात शाळेने सहभाग घेतला होता. या प्रदर्शात शाळेतील वस्तू विक्री साठी ठेवण्यात आले होते. प्रतिसाद उत्तम मिळाला. यावेळी संस्थेचे माहितीपत्रक व ब्रोशर स्टॉलला भेट देणा-या व्यक्तींना देण्यात आले होते.

विक्री

- मटरी, नाचणी बिस्किटे, चिंच सॉस, भाजणी व कापडी पिशव्यांची विक्री ऑर्डर प्रमाणे होत आहे.
- राखी पौर्णिमे निमित्त राख्या करण्यात येवून विक्री करण्यात आली.
- एकूण १२१ गणपती बटव्यांची विक्री करण्यात आली.
- जोशी फ्रूड - बाणेर येथे चिंच सॉस विक्री साठी ठेवण्यात येत आहे.

इतर

- यावर्षी ही बालकल्याण संस्थेत महिन्याच्या १, ३ व ५ व्या मंगळवारी विद्यार्थी ॲटिव्हिटी साठी जात होती.
- शाळेने पी.टी युनिफॉर्म विक्रीचे दुकान बदलेले आहे. याबाबतची पालकांना लेखी व तोंडी स्वरूपात माहिती देण्यात आली आहे.

देणगी स्वरूपात वस्तू

- सौम्यश्री शेवडे यांच्याकडून फूड प्रोसेसर देणगी स्वरूपात मिळाला आहे.
- सिम्बोयसिस कॉलेज मधील इंटर्नशिपला येणा-या विद्यार्थीनीनी सर्व विद्यार्थ्यांना बॉल भेट म्हणून दिला.
- विश्वस्त श्री. रोहीत ओगले यांच्याकडून मिळालेल्या देणगीतून कार्यशाळेत शिलाई मशिन घेण्यात आली

स्वाती सगम
मुख्याध्यापिका
एम.ओ.व्ही.एस